<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४७१/२०२२</u>                    <u>निशाणी क्र.४५</u>

**वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष,**

मी देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जे सांगेन ते सत्य असेल,

संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | संजय दत्तोबा जाधव, |
| माझे वय | : | ५७ वर्षे, धंदा : नोकरी, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, उदगीर. |
| राहणार | : | उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर. |

**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एम. सूर्यवंशी यांच्यामार्फत साक्षीदाराचा सर तपास</u>**

१. मी उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, उदगीर येथे मुख्यालय सहायक म्हणून कार्यरत आहे. मला न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त आहे. त्यानुसार मी आज वाद मिळकती संदर्भातील संपूर्ण मूळ अभिलेख सोबत घेऊन आलो आहे. सदर अभिलेख हा मौजे एकुर्का रोड या गावाच्या सर्वे क्र.७ चा एकत्रिकरणाचा आहे. मी हिस्सा फॉर्म क्र.४ चे मूळ अभिलेख सोबत आणले आहेत. आता मला सदर हिस्सा फॉर्म क्र.४ ची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. ती मूळ वरुन पडताळणी केली असता तीच आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येत आहे.

२. सर्वे क्र.७ चे गट पडून त्याचा नकाशा तयार करण्यात आला आहे. आता मला सदर नकाशाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्याची मूळ माझ्याच ताब्यात आहे. ती मूळ वरुन देण्यात आलेली आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येत आहे.

३. मी आज माझ्या सोबत फॉर्म क्र.९(३) आणि ९(४) चे मूळ अभिलेख सोबत आणले आहेत. आता मला त्याच्या प्रमाणित प्रती दाखविण्यात आल्या. त्या मूळ वरुन पडताळणी केल्या असता त्याच आहेत. त्यास एकत्रितपणे **नि.क्र.४८** देण्यात येत आहे.

४. एकत्रिकरणाची योजना राबविल्यानंतर सर्वे क्र.७ चे एकूण ६ हिस्से पडले. एकत्रिकरण योजना राबविण्यापूर्वीच सर्वे क्र.७ च्या पूर्वेकडून नांदेड–बीदर महामार्ग गेलेला आहे. सदर महामार्ग सर्वे क्र.७ मधून गेलेला नाही.

५. सर्वे क्र.७ मध्ये पडलेल्या ६ हिश्यांपैकी हिस्सा क्र.४ व ६ मिळून गट क्र.४ तयार झाला. त्याचे क्षेत्र २० आर आहे. मी मौजे एकुर्का रोड या गावाची मूळ शेत पुस्तिका सोबत आणलेली आहे. आता मला सदर शेत पुस्तिकेची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. ती मूळ प्रमाणे पडताळणी केली असता बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४९** देण्यात येत आहे. सदर शेत पुस्तिकेनुसार सर्वे क्र.७ चा हिस्सा क्र.३ मध्ये सडक आणि ३ खातेदार नामे बाबुराव रावसाहेब, मुकिंदा निळब आणि निवृत्ती अर्जुन यांची नावे आहेत.

प्रश्न – साक्षीदारास नि.क्र.४७ वरील नकाशा दाखवून गट क्र.४ च्या पूर्वेस काय दर्शविण्यात आले

आहे असा प्रश्न विचारण्यात आला.
उत्तर – त्यावर साक्षीदाराने पोटहिस्सा क्र.४ व ६ च्या पश्चिमेस बीदर–नांदेड महामार्ग असल्याचे सांगितले. तसेच त्या नकाशामध्ये गट क्रमांकाचा उल्लेख नसल्याचे देखील सांगितले.
सर तपास संपला.

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. पी. काळेगोरे यांच्यामार्फत वा.सा.क्र.३ यांचा उलट तपास**

६. मी आज माझ्यासोबत मौजे एकुर्का रोड या गावात एकत्रिकरण योजना राबविण्यापूर्वीचा व राबविल्यानंतरचा मूळ गाव नकाशा आणलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रिकरणापूर्वी वादीच्या कुटुंबियांचे क्षेत्र हे सर्वे क्र.७ मध्ये होते. प्रतिवादीचे पूर्वज म्हणजेच दगडू माणिकराव जाधव यांचे क्षेत्र हे सर्वे क्र.१ आणि ६ मध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र.७ च्या पूर्वेस नांदेड–बीदर महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र.१ च्या पश्चिमेस नांदेड–बीदर महामार्ग आहे.

७. मौजे एकुर्का रोड या गावात एकत्रिकरण योजना राबविल्यानंतरचा मूळ गाव नकाशा मी आज सोबत आणलेला आहे. सर्वे क्र.७ च्या पोट हिस्सा क्र.४ आणि ६ च्या पडलेल्या गट क्र.४ हा बाबु रावसाहेब यांच्या नावे असून त्याचे क्षेत्र २० आर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४ मधील संपूर्ण क्षेत्र म्हणजेच २० आर हे त्रिकोणी स्वरुपाचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४ च्या पूर्वेस नांदेड–बीदर महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.४ च्या पश्चिमेस गट क्र.५ आहे. गट क्र.३ च्या पश्चिम बाजूने नांदेड–बीदर महामार्ग गेलेला आहे. सदर महामार्ग गट क्र.३ मधून गेलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाव नकाशा प्रमाणे प्रतिवादीचा गट क्र.३ आणि वादीचा गट क्र.४ च्या मधून नांदेड–बीदर महामार्ग गेलेला आहे.

८. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र.१ आणि ७ च्या मधून नांदेड–बीदर महामार्ग गेलेला आहे. सदर महामार्ग सर्वे क्र.१ च्या पश्चिमेकडून आणि सर्वे क्र.७ च्या पूर्वेकडून गेलेला आहे. सदर महामार्ग सर्वे क्र.१ आणि ७ दोन्ही मधून देखील गेलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र.१ आणि ७ हे एकमेकांच्या लगत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३ आणि ४ हे एकमेकांच्या लगत नाहीत. सदर सर्वे क्र.१ आणि ७ तसेच गट क्र.३ आणि ४ यांच्यामधून सदर महामार्ग गेलेला आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडील गाव नकाशाप्रमाणे गट क्र.३ आणि गट क्र.४ मधील धारक हे एकमेकांचे शेजारी होऊ शकत नाहीत. आता साक्षीदारास नि.क्र.४० वरील मौजे

एकुर्का येथील गट क्र.३ व ४ चा टोच नकाशा दाखविण्यात आला. तो माझ्या कार्यालयाने जारी केलेला आहे. त्यावर माझी मुख्यालय सहायक म्हणून सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास यापूर्वीच नि.क्र.४० देण्यात आलेला आहे.

१०. नि.क्र.४७ मध्ये नमूद केलेला नांदेड–बीदर महामार्ग हा नेमक्या किती फूट रुंदीचा आहे, हे मला सांगता येत नाही. एकत्रिकरणापूर्वीचा व एकत्रिकरणानंतरचा गाव नकाशा, या दोन्हींच्याही प्रमाणित प्रती मी दाखल करु शकतो. साक्षीदाराने सदर दोन्ही नकाशाच्या प्रमाणित प्रती अभिलेखावर दाखल केल्या. त्या मूळ अभिलेखाप्रमाणे बरोबर आहेत. त्यास **अनुक्रमे नि.क्र.५२ व ५३** देण्यात येत आहे.

उलट तपास संपला. फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2026.03.13 15:23:36 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : १३.०३.२०२६

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
उदगीर